# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर

## प्रेस नोट दि.२१/०४/२०१९

## दि.२०/०४/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

**पो.स्टे.गुरनं./कलम** खडकी पो स्टे १५८/१९,भादविक ३९२,३४

**फिर्यादी** एक महिला,वय-२४ वर्षे,रा.बोपोडी,पुणे

**आरोपी** मोटार सायकलवरील दोन अनोळखी इसम (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.२०/०४/२०१९ रोजी २०/४५ वा. भाऊ पाटील रोड,वस्ताद श्री.बाबूराव गेनुजी बहिरट पाटील तालीम जवळ,खडकी,पुणे येथे

**तपशिल** यातील फिर्यादी हया त्यांचे बहिणीसह पायी फिरत असताना,नमुद इसमांनी दुचाकीवरून त्यांचे जवळ येवुन,फिर्यादी यांचे गळयातील सोन्याची चेन ५,०००/- रू किमतीची जबरदस्तीने हिसका मारून,तोडुन चोरून नेली आहे.

**त.अंमलदार** सहा.पो.निरी. देवकर ९५९४९८४२९१ / ८९९९२५६७२०

२

**पो.स्टे.गुरनं./कलम** खडकी पो स्टे १५७/१९,भादविक २७९,३०४(अ),मोव्हेॲक्ट १३२(१)(क),११९/१७७

**फिर्यादी** बबन आगळे, सहा.पोलीस उप-निरीक्षक,खडकी पोलीस ठाणे,पुणे शहर

**आरोपी** अज्ञात ट्रक चालक (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.१५/०४/२०१९ रोजी पहाटे ०१/३० वा. मुळा रोड चौक,खडकी,पुणे येथे

**तपशिल** खडकी पो स्टे अ.मयत रजि.नं.२०/२०१९,सीआरपीसी १७४ अन्वये मयताचे झाले तपासाचे चौकशीअंती कागदपत्राचे अवलोकन करता,यातील नमुद इसमाने त्याचे ताब्यातील ट्रक हा वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी रोडवर उभा असलेला अजय ज्ञानेश्वर गायकवाड,वय-२२वर्षे रा.८,मुळा रोड, खडकी,पुणे यास धडक देवुन,त्याचे डोक्यास व पायास गंभीर दुखापत करून,त्याचे मृत्युस कारणीभुत होवुन,अपघाताचे ठिकाणी न थांबता,अपघाताची खबर न देता पळुन गेला.

**त.अंमलदार** पो.उप.निरी. गिरी ८२९३२९२६३८

३

**पो.स्टे.गुरनं./कलम** शिवाजीनगर पो स्टे २२६/१९,भादविक ३५३,३३२,५०४

**फिर्यादी** किशोर शिंदे, पोलिस नाईक, डेक्कन वाहतुक विभाग,पुणे शहर

**आरोपी** महेश रमेश बोराडे,वय-२७ वर्ष,रा.सिध्दीविनायक कॉम्प्लेक्स,शिवणे,पुणे (अटक)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.२०/०४/२०१९ रोजी १७/३० वा. आयसीआयसी बँके समोर,घोले रोड,शिवाजीनगर,पुणे येथे

**तपशिल** यातील फिर्यादी हे नो-पार्किंग व डबल पार्कीग फुटपाथवरील वाहनावर घोले रोड शिवाजीनगर,पुणे येथे सरकारी गणवेशात कारवाई करीत असताना,नमुद इसम महेश रमेश बोराडे याने त्याचे दुचाकीस जामर लावल्याचे कारणावरून,चिडून जावून फिर्यादी यांचे अंगावर धावुन येवुन शिवीगाळ व हाताने मारहाण करून,फिर्यादी हे करीत असलेल्या सरकारी कामात अडथळा निर्माण केला आहे.

**त.अंमलदार** पो.उप.निरी. डी.एस.शिंदे ८१४९३६४१४१

४

**पो.स्टे.गुरनं./कलम** समर्थ पो स्टे १२३/१९,भादविक ३०६,३२३,५०४,३४

**फिर्यादी** महंमद शेख,वय-६७ वर्ष,रा. घर नं.५८९,नाना पेठ,पुणे

**आरोपी** दोन इसम व दोन महिला (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.०२/०४/२०१९ रोजी सकाळी ११/०० वा.चे पुर्वी रेल्वे कि.मी.नं.१८९/१८ जवळ, संगम ब्रीज जवळ,पुणे येथे

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा मुलगा मोहम्मद असगर मोहंमद शरीफ शेख,वय-४० वर्षे यास त्याची पत्नी,पत्नीची आई व भाऊ तसेच एक अज्ञात इसम यांनी संगनमत करून,मोहमद शेख यास वारंवार दिलेल्या मानसिक व शारिरीक त्रासास देवुन,त्यांचे त्रासास कंटाळुन नमुद वेळी व ठिकाणी मोहमद शेख यास रेल्वे गाडीखाली जीव देवुन आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. पी.आर.शिकलगार ९८२२१३७६९६ |
| **५** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे ३४६/१९,भादविक २७९,३३८,मोव्हेॲक्ट १८४,१३२(१)(क),११९/१७७ |
| **फिर्यादी** | मारुती हिंगणे,वय-४३ वर्षे,धंदा-शिक्षक,रा.स.नं.७९,लेन नं.१,हिंगणे मळा,हडपसर,पुणे |
| **आरोपी** | ट्रकवरील अज्ञात चालक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२०/०४/२०१९ रोजी सकाळी ०६/५० वा. आर.आर.डागा कपड्याचे समोर सोलापुर-पुणे रोडवर |
| **तपशिल** | यातील नमुद ट्रक वरील अज्ञात चालकाने त्याचे ताब्यातील ट्रक हा वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी फिर्यादी यांचे मोटार सायकलला जबर ठोस मारून,फिर्यादीस गंभीर जखमी करून,अपघाताचे ठिकाणी न थांबता,अपघाताची खबर न देता पळुन गेला. (फिर्यादी यांनी त्यांचे डोक्यावर हेल्मेट घातल्यामुळे त्यांचे डोक्याला गंभीर दुखापत झाली नाही.) |
| **त.अंमलदार** | पो.हवा. भोसले ९९२२९२६३०७ |
| **६** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | भारती विद्यापीठ पो स्टे ३२६/१९,भादविक २७९,३३८,मोव्हेॲक्ट ११९/१७७ |
| **फिर्यादी** | रेणुका काळेल,वय-३८ वर्ष,रा.स.नं.३२,माऊली नगर,शेलारमळा,पुणे |
| **आरोपी** | बाळु बापुसाहेब कसबे,वय-४२ वर्ष,रा.चाळ नं.१,आदर्शनगर,अप्पर इंदिरा नगर,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२०/०४/२०१९ रोजी सकाळी १०/०० वा. कात्रज चौक,कात्रज,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी ह्या त्यांची ॲक्टीव्हा घेवुन त्यांचे कामावर जाण्यासाठी कात्रज चौकात सिग्नलला थांबल्या असताना,यातील नमुद ट्रक चालकाने फिर्यादी यांचे डावीकडुन येवुन, त्याचा ट्रक अचानक उजवीकडे वळुन घेत असताना,सदर ट्रकचे उजवीकडील पाठीमागील चार चाकापैकी दोन चाक फिर्यादी यांचे डावे पायाचे पंजावरून तसेच डावे हाताचे पंजाला खरचटुन गेल्याने,फिर्यादी यांचे डावे पायाचे करंगळी व त्याचे शेजारील बोटास फ्रॅक्चर होवुन,डावे हाताचे पंजास खरचटुन फिर्यादी यांना जखमी करण्यास कारणीभुत झाला आहे. (फिर्यादी यांचे डोक्यावर हेल्मेट असल्यामुळे त्यांचे डोक्याला गंभीर दुखापत झाली नाही.) |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. लाड ९७६४००२८४१ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**